**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक २ एप्रिल २०२६**

**ठळक बातम्या**

**1. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा आज शेवटचा दिवस**

**2. हनुमान जयंती निमित्त मंदिरांमध्ये भाविकांची अलोट गर्दी; आकर्षक शोभा यात्रांचं आयोजन**

**3. दक्षिण पूर्व मध्य रेल्वेची या आर्थिक वर्षात उल्लेखनीय कामगिरी; अप्रवासी भाड्यातून 4 कोटींपेक्षा अधिक उत्पन्न**

**4. महाराष्ट्र ज्ञान सभेतर्फे 'विकसित महाराष्ट्रासाठी शिक्षण' या विषयावर नागपुरात 2 दिवसीय राष्ट्रीय परिषदेचं आयोजन**

**आता सविस्तर बातम्या …….**

**लोकसभा**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा आज शेवटचा दिवस आहे. अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्यात राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरचा आभार प्रस्ताव संमत झाला, तसंच २०२६-२७ चा केंद्रीय अर्थसंकल्प मांडण्यात आला. दुसऱ्या टप्प्यात, संसदेत वित्त विधेयक २०२६ आणि विनियोग विधेयक २०२६ याला मंजुरी मिळाली. या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये पश्चिम आशियामधील संघर्षामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर सरकारची भूमिका मांडली.

**कर्मयोगी साधना सप्ताह**

विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी 'नागरिक देवो भव' या मूलमंत्राचा अंगिकार करून सार्वजनिक सेवेला अधिक सक्षम करण्यावर भर दिला जात असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. कर्मयोगी साधना सप्ताह २०२६ या कार्यक्रमात त्यांनी दूरदृष्य प्रणालीच्या माध्यमातून संबोधित केलं. वेगानं बदलणाऱ्या आकांक्षांमुळे केवळ कार्यक्षमच नव्हे, तर नागरिक-केंद्रित प्रशासनाची आवश्यकता निर्माण झाल्याचं ते म्हणाले

क्षमता निर्माण आयोग आणि मिशन कर्मयोगी हे प्रत्येक भारतीयाच्या आकांक्षांशी सुसंगत, आधुनिक, समर्पित आणि प्रतिसादक्षम मनुष्यबळ तयार करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहेत, असं पंतप्रधानांनी नमूद केलं.

**हनुमान जयंती**

देशासह राज्यभरात आज हनुमान जयंतीचा उत्साह आहे. सामर्थ्याचं प्रतीक असलेल्या हनुमंताच्या दर्शनासाठी मंदिरांमध्ये भाविकांच्या रांगा दिसून येत आहेत. ठिकठिकाणच्या हनुमान मंदिरांमध्ये सकाळी सहा वाजता हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी हनुमान जयंतीनिमित्त सर्व देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. नागपूरच्या राजाबाक्षा हनुमान मंदिरातून आज ७०-८० देखावे असलेली शोभायात्रा थोड्याच वेळात शहराच्या विविध भागातून मार्गक्रमण करेल. यंदा शोभायात्रेचं हे ३० वं वर्ष आहे. नागपूर आणि मध्यप्रदेश सीमेवरील सौंसर इथल्या प्रसिद्ध जामसावळी इथल्या

हनुमान मंदिरात भाविकांनी गर्दी केल्याचं चित्र दिसून आलं. महाराष्ट्र, मध्यप्रदेशसह अन्य राज्यातून देखील इथं मोठ्या संख्येनं भक्त दाखल होतात. बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा इथल्या 105 फूट उंच हनुमान मूर्तीवर महाजलाभिषेकासह इथं भव्य उत्सवाचं आयोजन करण्यात आलं. आज विधीवत पूजनानंतर रिमोटद्वारे पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी आमदार चैनसुख संचेती यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. हनुमान चालीसा, रामरक्षा पठण आणि अन्नदान सोहळ्यामुळे धार्मिक वातावरण निर्माण झालं. गजकेसरी योगाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या सोहळ्यास महाराष्ट्रासह मध्य प्रदेश, गोवा, कर्नाटक आणि तामिळनाडूतून मोठ्या संख्येनं भाविकांनी उपस्थिती लावली. गोंदिया शहरातील गौतम नगर परिसरातील सुमारे 300 वर्षे जुन्या प्राचीन हनुमान मंदिरातील झोपलेल्या अवस्थेतील स्वयंभू मूर्तीचं दर्शन घेण्यासाठी भाविकांनी गर्दी केल्याचं आमच्या प्रतिनिधीनं सांगितलं.

**मदरसा आधुनिकीकरण**

राज्य सरकारनं डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेअंतर्गत 21 जिल्ह्यांमधील 308 मदरशांच्या आधुनिकीकरणासाठी 50 लाख रुपये निधीची तरतूद करण्याचा शासन निर्णय जाहीर केला आहे. याबाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष प्यारे जिया खान यांनी सांगितलं की या निर्णयामुळे मदरशात मिळणाऱ्या धार्मिक शिक्षणासोबतच आधुनिक शिक्षण सुद्धा मुस्लिम समाजातील युवकांना उपलब्ध होणार आहे.

**प्रताप सरनाईक**

राज्यात वाढत्या अवैध प्रवासी वाहतुकीच्या पार्श्वभूमीवर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय आढावा बैठक पार पडली. १ महिन्याच्या अहवालात अवैध वाहतूक मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचं उघड झालं असून अपेक्षित कारवाई होत नसल्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली. एसटी आणि आरटीओ विभागांमध्ये समन्वयाचा अभाव आणि आदेशांची अंमलबजावणी न होणं ही प्रमुख कारणं असल्याचं स्पष्ट झालं. सरनाईक यांनी संयुक्त कारवाईचे फोटो आणि अहवाल सादर करणं बंधनकारक करत निष्क्रिय अधिकाऱ्यांवर कारवाईचा इशारा दिला आहे. तसेच GPS आणि फोटो रिपोर्टिंगद्वारे पारदर्शकता वाढवून अवैध वाहतुकीवर कठोर नियंत्रण आणण्याचे निर्देश देण्यात आले.

**अवकाळी पाऊस**

राज्यात वादळी वारा आणि गारपीटीमुळे १ लाख २२ हजार हेक्टरहून अधिक क्षेत्रावरील शेती पिकांचं नुकसान झालं आहे. राज्यभरातील नुकसानीची माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडून घेऊन तातडीनं पंचनामे पूर्ण करून बाधित शेतक-यांना लवकरात लवकर मदत दिली जाईल, असं आश्वासन राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. भरणे यांनी आज भोर तालुक्यातील वडगाव डाळ इथं भेट देऊन नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली.

**दक्षिण पूर्व मध्य रेल्वे**

दक्षिण पूर्व मध्य रेल्वेनं या आर्थिक वर्षात संचालन, माल वाहतूक, वाणिज्य, सिग्नल आणि दूरसंचार तसंच कार्मिक या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली असून रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेला प्राथमिकता दिली असल्याची माहिती दक्षिण पूर्व मध्य रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक दीपककुमार गुप्ता यांनी आज आयोजित पत्रकार परिषदेत दिली. नागपूर विभागानं दक्षिण पूर्व रेल्वे विभागाच्या एकूण 261.25 मिलियन टन मालवाहतुकीपैकी 20.84 मिलियन टन इतकी मालवाहतूक केली असून या क्षेत्रात 21 व्या क्रमांकावरून 19 व्या क्रमांकावर झेप घेतली असल्याची माहिती गुप्ता यांनी दिली.

अप्रवासी भाड्यामधून  4 पूर्णांक 10 कोटी इतकं उत्पन्न प्राप्त झालं असून यामध्ये तिकीट तपासणीमधून 17 पूर्णांक 17 कोटी, तर पार्किंग महसुलातून 1 पूर्णांक  65 कोटी महसूल  प्राप्त झाला आहे . दक्षिण पूर्व मध्य रेल्वेत गेल्या वर्षी नियुक्ती करण्यात आलेल्या 864 कर्मचाऱ्यांपैकी नागपूर विभागात 148 जणांना नियुक्ती मिळाल्याची माहिती देखील त्यांनी दिली.

**मध्य रेल्वे**

दरम्यान मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक विवेककुमार गुप्ता यांनी मध्य रेल्वेच्या गेल्या आर्थिक वर्षातील उपलब्धीबाबत व्हिडीओ कॉन्फ़रन्सिंगद्वारे माहिती  दिली. यावेळी नागपूर, सोलापूर, पुणे आणि भुसावळचे विभागीय व्यवस्थापक उपस्थित होते. मध्य रेल्वेद्वारे विकसित केली जाणारी सर्व 12 नवी अमृत रेल्वे स्थानकं महाराष्ट्रातच असल्याचं गुप्ता म्हणाले. रेल्वे मदत या ॲपद्वारे सफाई संदर्भात सर्व प्रकारची सहायता केली जात असल्याची माहिती मध्य रेल्वेचे नागपूर विभागीय व्यवस्थापक विनायक गर्ग यांनी यावेळी दिली.

**ॉ. पंकज भोयर**

वर्धा इथं अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये 8 उमेदवारांना पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते शासकीय नोकरीचे नियुक्ती आदेश देण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात जिल्ह्यातील पात्र 30 उमेदवारांपैकी काहींना इतर जिल्ह्यांत नियुक्ती देण्यात आल्याची माहिती देण्यात आली. खून प्रकरणातील पीडित कुटुंबांना आधार देण्यासाठी पात्र सदस्यांना शासन नोकरी देण्याचं धोरण असल्याचं भोयर यांनी सांगितलं. वर्धा जिल्ह्यात 8, तर चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा आणि नागपूर इथंही काही उमेदवारांना नियुक्त्या देण्यात आल्या आहेत. अनुसूचित जमातीतील 11 उमेदवारांना आदिवासी विकास विभागामार्फत नियुक्ती दिली जाणार आहे. नियुक्त उमेदवार समाजकल्याण विभागाच्या शाळा आणि वसतिगृहांमध्ये विविध पदांवर कार्य करतील.

**राष्ट्रीय परिषद**

महाराष्ट्र ज्ञान सभा 'विकसित महाराष्ट्रासाठी शिक्षण' या विषयावर 2 दिवसीय राष्ट्रीय परिषदेचं आयोजन येत्या 4 एप्रिलपासून नागपूरच्या विश्वेश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था इथं करण्यात आलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या परिषदेचं उद्घाटन होईल, तर 5 एप्रिल रोजी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत समारोप होईल. राज्यातील शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्टता प्राप्त करण्यासाठी शिक्षणतज्ज्ञ, धोरणकर्ते, शैक्षणिक संस्था आणि उद्योग क्षेत्रातील दिग्गजांना एकाच मंचावर आणून विचारमंथन करणं हा या ज्ञानसभेचा मुख्य उद्देश आहे. ही 2 दिवसीय राष्ट्रीय परिषद शिक्षा संस्कृती उत्थान न्यास, नवी दिल्ली यांचा एक उपक्रम असून यात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली, भारतीय व्यवस्थापन संस्था नागपूर, तसंच व्हिएनआयटी यांचा समावेश आहे. त्याचबरोबर उच्चशिक्षण संस्थेचे सुमारे 500 हून अधिक प्रतिनिधी सुद्धा या परिषदेसाठी येणार असल्याची माहिती व्हिएनआयटीचे संचालक प्रोफेसर प्रेमलाल पटेल यांनी पत्रकार परिषदेत दिली. या प्रसंगी शिक्षा संस्कृती उत्थान न्यासचे राष्ट्रीय सचिव अतुल कोठारी, नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर आणि गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे उपस्थित होते.

**हवामान**

विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यांमध्ये येत्या ६ एप्रिलपर्यंत वादळी पर्जन्यमानाची शक्यता प्रादेशिक हवामान विभागानं वर्तवली आहे.  आज यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली हे जिल्हे वगळता सर्वत्र विजांच्या कडकडाटासह वादळ आणि सोसाट्याचा वारा येण्याची शक्यता असल्यानं वादळी

पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तत्पूर्वी काल रात्री नागपुरात विजांच्या कडकडाटासह जोरदार पर्जन्यवृष्टी आणि काही भागात गारपीट देखील झाली. दरम्यान, आगामी काही तासांत चंद्रपूर आणि बुलढाणा इथं हलक्या पावसाचा अंदाज आहे.

******